बीड (महाराष्ट्र) । सायं.दैनिक । मराठी । वर्ष – ०२ । अंक – ३६४ । वार गुरूवार दि २५ सप्टेंबर एमएचएमएआर /२०२३/८३९६५ । किंमत ३ रू. । पाने ४

Beed (Maharashtra) Daily Evening Marathi n Year - 02 Issue - 364 thusday 25 September 2025 RNI : MAHMAR/2023/83965 Price - 3 Rupees Pages 4

# मायबाप सरकार.. शेतकऱ्यांचा आक्रोश ऐका, शेत जमीनी खरडून गेल्याने शेतकऱ्यांचे संसार उघडे पडले

## आपल्याकडून शेतकऱ्यांना खूप अपेक्षा आहेत?

### सरकार आता तरी जागं झालं नाही तर बळीराजाचा हा आक्रोश चळवळीत बदलून वादळ बनेल?

बीड जिल्ह्याचा अतिवृष्टीने चुराडा झाला आहे. शेतं वाहून गेली, पिकं नष्ट झाली, घरं उद्ध्वस्त झाली, संसार उघड्यावर आला. शेतकरी हतबल आहे, पण सरकारकडून मिळणारी मदत ही केवळ चेष्टा असल्याने संताप उफाळून आला आहे. शेतकऱ्यांचा आक्रोश स्पष्ट आहे की, आम्ही शेतात हाडं मोडून जगतो. पण संकटात सरकार आमच्या रक्ताची थट्टा करतं. जर मदत नाही दिली, तर बळीराजा रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नाही. आणि आम्ही रस्त्यावर उतरलो तर मंत्र्यांनाही ठिकाणी ठिकाणी हिशोब द्यावा लागेल अशी संतप्त प्रतिक्रिया शेतकरी वर्गातून उमटत आहेत.

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक :- दिपक थोरात मो.९८६०८९८५६४



# सरकारने ओला दुष्काळ जाहीर करून तात्काळ मदत केली नाही, तर संतप्त बळीराजा रस्त्यावर उतरल्यावर मंत्र्यांना ठोकायलाही मागे-पुढे पाहणार नाही?

## शेतकरी संतप्त : आम्ही आयुष्यभर शेतीत हाडं मोडतो, पण संकटात सरकार आमच्या रक्ताची चेष्टा करतंय?

बीड (प्रतिनिधी):– अतिवृष्टी आणि पुराने बीड जिल्ह्याचा अक्षरशः चुराडा करून टाकला आहे. शेतं वाहून गेली, पिकं नष्ट झाली, घरं उद्ध्वस्त झाली, संसार उघड्यावर आले. जमिनीतील मातीऐवजी शेवाळ उरलं आहे. शेतकरी बळीराजाच्या आयुष्याचा चाळण होऊन बसला आहे. डोळ्यांत अश्रूंचा महापूर आणि मनात असहायतेचा आक्रोश आहे. पण या सर्व परिस्थितीत सरकारच्या उदासीनतेने संतापाचं वादळ उसळलं आहे.

शेतकऱ्यांना तात्काळ दिलासा देण्याऐवजी सरकारने दिलेले केवळ सात हजार रुपये, हे खरं तर चेष्टेपेक्षा कमी नाही. लाखो रुपयांच्या नुकसानासमोर ही रक्कम तोंडाला पाने पुसण्यासारखी आहे. शेतकरी म्हणतात, आम्ही शेतीत हाडं मोडून जगतो, पण संकटात मात्र सरकार आमच्या रक्ताची चेष्टा करते. शिरूर कासार, बीड ग्रामीण, गेवराई, माजलगांव, आष्टी या तालुक्यांमध्ये विशेषतः अतिवृष्टीचा मोठा फटका बसला आहे. अनेकांच्या घरांची चूल–मूठ उघडी पडली, अंगणात चिखलाच्या लाटांनी थैमान घातलं. शेतांमध्ये पिकं नष्ट, तर जमिनी खरडून गेल्या आहेत. आज शेतकऱ्यांच्या मागण्या आक्रोशातून पुढे येत आहेत. हेक्टरी ५० हजार रुपये तातडीने मदत द्या, ओला दुष्काळ जाहीर करून कर्जमाफी द्या, कांद्याच्या पिकाला वेगळी नुकसानभरपाई द्या, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. आता फक्त मागणं नाही, तर शेवटचा इशारा आहे. शेतकऱ्यांचा इशारा स्पष्ट आहे. आमचं ऐका, आमच्या संसाराला हात द्या; अन्यथा संतप्त बळीराजा रस्त्यावर उतरला तर मंत्र्यांनाही ठिकाणी ठिकाणी हिशोब द्यावा लागेल. आज बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांची परिस्थिती ही फक्त नैसर्गिक आपत्ती नाही, तर शासनाच्या ढिसाळ व्यवस्थापनाचा परिणाम आहे. सरकारने आता तरी जागे व्हावं, अन्यथा हा आक्रोश चळवळीत बदलून वादळ होईल. शेतकरी आज दयनीय अवस्थेत आहेत, पण लक्षात ठेवा सरकार भुकेल्या, उध्वस्त शेतकऱ्याचा आक्रोश जेव्हा संतापात बदलतो तेव्हा गादी–तख्ते हलवायला वेळ लागत नाही. शेकडो एकरांवरील पिकं पूर्णपणे नष्ट झाली आहेत. शेतजमिनी खरडून गेल्या, शेतीचे स्वरूप बदलले, तसेच अनेकांची घरं उद्ध्वस्त होऊन संसार उघड्यावर आला आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या डोळ्यांत हतबलतेचे अश्रू आहेत. नुकसानीचं चित्र पाहता शेतकरी संतप्त झाले आहेत.



### शिरूर कासार, गेवराई, बीड, माजलगाव, आष्टी तालुक्यांना मोठा तडाखा बसला!

बीड जिल्ह्यातील शिरूर कासार, गेवराई, बीड ग्रामीण, माजलगाव आणि आष्टी तालुक्यांना मोठा तडाखा बसला आहे. शेकडो एकरांवरील पिकं अक्षरशः वाहून गेली असून शेतजमिनी खरडून गेल्यामुळे शेतकऱ्यांचे संसार उद्ध्वस्त झाले आहेत. गेल्या काही दिवसांपासून जिल्ह्यात संततधार पाऊस होत होता. त्यातच नद्या–नाल्यांना आलेल्या पुरामुळे शेतीमालासह घरगुती साहित्य, जनावरे, रस्ते आणि विहिरी यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. काही ठिकाणी शेतजमिनींवर वाळू–गोट्यांचे थर साचले आहेत, तर काही ठिकाणी पूर्ण जमीन वाहून गेली आहे. सरकारने तत्काळ पंचनामे करून मदत द्यावी, शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसह मोफत बी–बियाणे आणि जनावरांसाठी चाऱ्याची तातडीने व्यवस्था करावी, अशी मागणी शेतकरी संघटनेकडून होत आहे.

### आता सरकारच्या निर्णयाकडे बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे लक्ष?

अचानक आलेल्या आपत्तीमुळे शिरूर कासार, गेवराई, बीड ग्रामीण, माजलगाव आणि आष्टी तालुक्यांना मोठा तडाखा बसला आहे. शेकडो एकरांवरील पिकं वाहून गेली, जमीन खरडली गेली, तर अनेक कुटुंबांचा संसार उद्ध्वस्त झाला. शेतकरी हतबल झाले असून प्रशासनावर मदतीचा मारा सुरू आहे. या पार्श्वभूमीवर आता सरकार काय निर्णय घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. शेतकऱ्यांना दिलासा मिळणार का? की मदतीसाठी कागदी घोषणाच होणार? असा प्रश्न उपस्थित होत आहे. जिल्ह्यातील जनतेच्या नजरा थेट मंत्रालयाकडे लागल्या आहेत. स्थानिक पातळीवर दौरे सुरू असले तरी शेतकऱ्यांना तातडीची आर्थिक मदत, कर्जमाफी आणि पुनर्वसनाची मागणी होत आहे. दरम्यान, शेतकरी संघटना आक्रमक भूमिकेत असून, ठोस निर्णय न झाल्यास रस्त्यावर उतरल्याशिवाय पर्याय नाही, असा इशारा त्यांनी दिला आहे.


# बीड जिल्ह्यातील पूरग्रस्त शेतकऱ्यांच्या पाठीशी महायुती सरकार खंबीरपणे उभे- पालकमंत्री अजितदादा पवार यांची ग्वाही

### – बीड तालुक्यातील पूरग्रस्त गावांमध्ये दौरा

### – भरीव मदत द्या; डॉ.योगेश क्षीरसागरांची मागणी

बीड (प्रतिनिधी) दि.२५ : बीडसह जिल्ह्यात अनेक ठिकाणी अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. पूरग्रस्त शेतकऱ्यांच्या पाठीशी महायुती सरकार खंबीरपणे उभे आहे, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांनी दिली. बीड तालुक्यातील हिंगणी खुर्द येथे गुरुवारी (दि.२५) सकाळी ७ वाजता पूरस्थितीची पाहणी करून अजितदादा पवार यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी मागील दोन दिवसांपासून पूरग्रस्त भागाला भेट देऊन शेतकऱ्यांच्या व्यथा ऐकल्या होत्या. त्यानंतर त्यांनी सविस्तर माहिती अजितदादांकडे सादर केली होती. त्याअनुषंगाने झालेल्या पाहणी दौऱ्यात त्यांनी शासकीय यंत्रणेला आवश्यक त्या सूचना दिल्या.

यावेळी आमदार विक्रम काळे, विजयसिंह पंडित, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष ड.राजेश्वर चव्हाण, बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, ज्येष्ठ नेते रमेश आडसकर, युवक जिल्हाध्यक्ष बळीराम गवते, बीडचे तालुकाध्यक्ष ड.राजेंद्र राऊत, भाजपचे ज्येष्ठ नेते विजय पालसिंगणकर, सरपंच संतोष तांदळे



यांच्यासह विविध पक्षाचे पदाधिकारी, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, पोलीस अधीक्षक नवनीत कावत, मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहमान यांच्यासह महसूल, जिल्हा परिषद, कृषी विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

पुढे बोलताना अजितदादा पवार म्हणाले की, अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. सरकार गंभीरतेने मदत करण्याच्या प्रयत्नात आहे. अद्याप कुणी आले नाही म्हणून गैरसमज करून घेऊ नका. बीड जिल्ह्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरीव मदत करण्यासाठी शासन कटिबद्ध आहे, अशी ग्वाही अजितदादा पवार यांनी दिली. तसेच, शासनाच्या वतीने सुरू असलेले मदत कार्य प्रत्येकापर्यंत पोहोचले पाहिजे, याची काळजी घेण्याच्या सूचना जिल्हा प्रशासनाला दिल्या. पुरामुळे ज्या शेतकऱ्यांच्या विहिरी बुजल्या आहेत, त्यांना नव्याने योजना करून विहिरी उपलब्ध करून दिल्या जातील, असेही ते म्हणाले. यावेळी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ भरीव मदत द्यावी, अशी मागणी डॉ.योगेश क्षीरसागर यांनी अजितदादा पवार यांच्याकडे केली आहे.

## संपादकीय...

# मायबाप सरकार, फक्त कागदावर नको, बांधांवर या! निकष बाजूला सारून मदतीचा हात पुढे केला पाहिजे

मराठवाड्यावर निसर्गाचा कोप झाला आहे की, पाऊस रझाकार झाला आहे, हा प्रश्न भेडसावतोय. कायम पाण्यासाठी आसुसलेला हा भूप्रदेश आज अक्षरशः पाण्यात बुडालेला आहे. वयोवृद्ध सांगतात, पावसाचं इतकं भयावह 'निजामी' रूप कधीच पाहिलं नव्हतं. मुसळधार पावसाने शेतं चिखलात गाडली, माती खरवडून नेली, हातातोंडाशी आलेला घास हिरावून घेतला. अनेकांचे संसार उघड्यावर पडले; डोळ्यांतलं पाणीही पावसात मिसळलं.

या पावसाने तब्बल ३६०० गावे झोडपली, १२९ मंडलांत अतिवृष्टी केली, तर ७ लाख हेक्टरवरील पिके पूर्णपणे नष्ट झाली. लाखो शेतकरी उद्ध्वस्त झाले. बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला आणि नैर्ऋत्य मान्सूनची दिशा अचानक बदलली. ढगांचा डोंगर जमा झाला आणि मराठवाड्यावर आभाळच कोसळलं! जयकवाडीसह सर्व धरणं काठोकाठ भरून वाहू लागली. यंदा तहान भागवायला नाशिक-अहिल्यानगरचं पाणी मागण्याची वेळच आली नाही; उलट जयकवाडीतून जलक्षमतेच्या दुप्पट पाणी नदीत सोडावं लागलं. ५०० अब्ज घनफूट पाणी वाहून गेलं. माजलगाव, मांजरा, तावरजा, सिद्धेश्वर.. हीच अवस्था. लातूर, धाराशिव, बीड जिल्ह्यात तर पावसाने कहर केला. ७ लाख हेक्टरवरील मका, सोयाबीन, उडीद, मूग पाण्यात गाडले गेले. पैठण-पाचोड भागात मोसंबी, डाळिंबाच्या बागा बुडाल्या. उसाचे फड भुईसपाट झाले.

पावसाने केवळ शेतीच नाही तर जीवितहानीही केली. आजवर १८ जणांचे बळी गेले, गायी-म्हशी, बैल अशा पशुधनाची तर किती हानी झाली, याची गणनाच करता येणार नाही. शेकडो घरं, शाळा कोसळल्या. रस्ते, पूल वाहून गेले. हा विध्वंस पाहून १९९३ च्या भूकंपाच्या आठवणी जाग्या होतात. तो धरणीकंप होता, हे आभाळाचं रौद्ररूप आहे. मराठवाडी माणसांच्या नशिबी झोपायला धरणी आणि पांघरायला आकाश एवढंच; पण धरणी उसवली आणि आभाळच फाटलं तर शिवायचं तरी कसं?

पिकांचा चिखल आणि उघड्यावर पडलेला संसार पाहून धाय मोकलून हंबरडा फोडणाऱ्या माता-भगिनींना कोणत्या शब्दाने धीर देणार? पाण्यात बुडालेली शेती पाहून हताश झालेल्या शेतकऱ्यांच्या अंत:करणात किती कोलाहल असेल, याची कल्पना करता येणार नाही. सरकारने पंचनाम्याचे आदेश दिले आहेत. मंत्री पाहणी दौऱ्यासाठी मुंबईबाहेर पडले आहेत. अधिकारी सांगत आहेत की, 'ही नैसर्गिक आपत्ती आहे; निकषांनुसार मदत दिली जाईल', पण एवढ्या मोठ्या विध्वंसावर ही तुटपुंजी मदत म्हणजे शेतकऱ्याच्या जखमेवर मीठ चोळण्याचा प्रकार. मराठवाड्यातील नुकसानभरपाईपोटी राज्य सरकारने केंद्राकडे १४४९ कोटींची मदत मागितली, मिळाले फक्त ७२१ कोटी. हा आकड्यांचा खेळ आहे की, शेतकऱ्यांची थट्टा? पिकं गेली, संसार उघडा पडला; पण मदत म्हणजे थेंबभर पाणी!

आज गरज आहे तातडीच्या आणि थेट मदतीची. नुकसानभरपाईचे निकष शिथिल करून, लालफितीच्या विळख्यात न अडकवता शेतकऱ्यांच्या खात्यात त्वरित मदत पोहोचली पाहिजे. विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर 'लाडक्या बहिणींच्या' खात्यात कोट्यवधी रक्कम जमा करण्याची तत्परता दाखवली गेली, तेवढीच तत्परता शेतकऱ्यांना वाचवण्यासाठी दाखवायला काय हरकत आहे? आकडे, जीआर, पंचनामे अशा प्रकारच्या कसरतीत शेतकरी आणखी खचून जाईल. त्याऐवजी जर तुम्ही प्रत्यक्ष गावात जाऊन शेतकऱ्यांचे दु:ख डोळ्यांनी पाहिलंत, तर कदाचित तुमच्या डोळ्यांतही पाणी येईल. तोच दिलासा आज गरजेचा आहे. नुकसानभरपाईचे सगळे निकष बाजूला सारून सरकारने मदतीचा हात पुढे केला पाहिजे. मदत देताना जुना जीआर की नवा, हा सरकारी घोळ घालण्याचा हा प्रसंग नाही.

मराठवाड्यावर निसर्गाचा कोप झाला आहे की, पाऊस रझाकार झाला आहे, हा प्रश्न भेडसावतोय. कायम पाण्यासाठी आसुसलेला हा भूप्रदेश आज अक्षरशः पाण्यात बुडालेला आहे. वयोवृद्ध सांगतात, पावसाचं इतकं भयावह 'निजामी' रूप कधीच पाहिलं नव्हतं. मुसळधार पावसाने शेतं चिखलात गाडली, माती खरवडून नेली, हातातोंडाशी आलेला घास हिरावून घेतला. अनेकांचे संसार उघड्यावर पडले; डोळ्यांतलं पाणीही पावसात मिसळलं. या पावसाने तब्बल ३६०० गावे झोडपली, १२९ मंडलांत अतिवृष्टी केली, तर ७ लाख हेक्टरवरील पिके पूर्णपणे नष्ट झाली. लाखो शेतकरी उद्ध्वस्त झाले. बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला आणि नैर्ऋत्य मान्सूनची दिशा अचानक बदलली. ढगांचा डोंगर जमा झाला आणि मराठवाड्यावर आभाळच कोसळलं! जयकवाडीसह सर्व धरणं काठोकाठ भरून वाहू लागली. यंदा तहान भागवायला नाशिक-अहिल्यानगरचं पाणी मागण्याची वेळच आली नाही; उलट जयकवाडीतून जलक्षमतेच्या दुप्पट पाणी नदीत सोडावं लागलं. ५०० अब्ज घनफूट पाणी वाहून गेलं. माजलगाव, मांजरा, तावरजा, सिद्धेश्वर.. हीच अवस्था. लातूर, धाराशिव, बीड जिल्ह्यात तर पावसाने कहर केला. ७ लाख हेक्टरवरील मका, सोयाबीन, उडीद, मूग पाण्यात गाडले गेले. पैठण-पाचोड भागात मोसंबी, डाळिंबाच्या बागा बुडाल्या. उसाचे फड भुईसपाट झाले.पावसाने केवळ शेतीच नाही तर जीवितहानीही केली. आजवर १८ जणांचे बळी गेले, गायी-म्हशी, बैल अशा पशुधनाची तर किती हानी झाली,

# राजकीय हेतूने चुकीचे वार्तांकन करणाऱ्या वृत्तपत्र व पत्रकारितेचा जाहीर निषेध - गणेश लांडे

बीड -(प्रतिनिधी) राजकीय हेतूने चुकीचे वार्तांकन करणाऱ्या वृत्तपत्र आणि पत्रकारितेचा जाहीर निषेध करीत सदरील वृत्तपत्राचे जाहीर दहन आंदोलन भाजपा जिल्हा सरचिटणीस गणेश लांडे यांच्या नेतृत्वात करण्यात आले आहे.

बीड येथील पार्श्वभूमी नावाच्या दैनिकात दि. २४/०९/२०२५ च्या अंकात पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या संदर्भात राजकीय हेतूने प्रेरित चुकीचे वृत्त छापण्यात आले आहे असे प्रतिपादन आंदोलक व भाजप सरचिटणीस गणेश लांडे यांनी केले आहे. याविषयी स्पष्टीकरण देताना लांडे म्हणाले की, २१. तारखेला मा. पंकजाताई यांनी पाटोदा तालुक्यातील वैद्यकीन्ही व भाकरे वस्ती सह अनेक गावांना भेटी दिल्या पूरग्रस्त शेतकऱ्याच्या बांधावर जाऊन त्यांना आधार देत अस्वस्थ केले. जिल्हाधिकाऱ्या बरोबर परिस्थितीचा आढावा



घेऊन त्यांना सूचना केल्या व मंगळवारच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीला उपस्थित राहण्यासाठी पंकजाताई मुंबईला पोहचल्या आणि इकडे बीड जिल्हा आणि परिसरात धडफुटी सदृश्य पाऊस सुरू झाला. पावसाचे वृत्त समजताच ताईंना तत्काळ परिस्थितीचा आढावा घेतला अधिकारी व कार्यकर्त्यांना तातडीचे आदेश व सूचना दिल्या. व्हिडिओ क्लिप पाठवून पीडितांना आपण व सरकार आपल्या पाठीशी खंबीर आहोत असा दिलासाही दिला.

मंत्रिमंडळाची बैठक संपवून ताई ताबडतोप गावाकडे निघाल्या व दुसऱ्या दिवशी सकाळी सहा वाजता शेतीच्या बांधावर पोहचल्या व जालना व बीड जिल्ह्यातील पूरप्रस्थितीचा आढावा रात्री अकरा वाजेपर्यंत करीत पीडित शेतकऱ्यांना धीर व दिलासा देत तात्काळ मदतीचे वचन देत होत्या. पर्यावरण मंत्री म्हणून पंकजा ताई यांच्यावर महाराष्ट्राची जबाबदारी असताना ताई शेतकऱ्याच्या पाठीशी खंबीर उभ्या आहेत आणि पंकजाताई आपल्याला वाऱ्यावर सोडणार नाहीत असा प्रत्येक शेतकऱ्याला पूर्ण विश्वास आहे. तरीही पार्श्वभूमी सारखे वृत्तपत्र राजकीय हेतूने प्रेरित होऊन पंकजाताई मुंडे यांच्या संदर्भात चुकीच्या आणि दिशाभूल करणाऱ्या बातम्या प्रसिद्ध करते . अशावेळी अशा वृत्तपत्राचा जाहीर निषेध करायलाच पाहिजे अशी संतप्त प्रतिक्रिया श्री .गणेश लांडे यांनी दिली. या आंदोलनावेळी प्रामुख्याने गणेश पुजारी दत्तप्रसाद जाधव, ज्योतिबा नन्नवरे, राहुल जोगदंड, अमोल वडतीले, आप्पासाहेब झोडगे, सलीम अत्तार, महादेव नागरगोजे, घोलप मामा, नरेश पवार हे कार्यकर्ते व बहुसंख्येने नागरिक उपस्थित होते. यावेळी ,पंकजाताई तुम आगे बढो - हम तुम्हारे साथ है। या घोषणेने परिसर दणाणून गेला होता.

# शेतकरी जनहित कामगार मंच महाराष्ट्रभर दोन लाख झाडे लावण्याची मोहीम राबवणार



बीड (प्रतिनिधी):- शेतकरी जनहित कामगार मंच गेल्या अनेक वर्षापासून शेतकऱ्यांच्या हिताचे व पर्यावरणाच्या रक्षणाचे काम करत असून दोन लाख झाडे लावण्याचे उद्दिष्ट समोर ठेवून त्या दृष्टीने काम सुरू असल्याचे आमच्या प्रतिनिधीशी बोलताना प्रदीप गायकवाड, पांडुरंग कसबे, श्रीपती सोळुंके, ज्ञानेश्वर जाधव, शिवाजी राठोड, अतिक सय्यद, राहुल रोकडे, इंद्रजीत डोंगरे, यांनी सांगितले.

याविषयी सविस्तर माहिती अशी की दिनांक २४/०९/२०२५ रोजी किल्ले धारूर तालुक्यातील आडहिंगणी तांडा या ठिकाणी जिल्हा परिषद शाळेच्या परिसरामध्ये मंचाचे पदाधिकारी ज्ञानेश्वर जाधव यांच्या माध्यमातून वृक्षारोपण करण्यात आले. येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचा परिसर दत्तक घेऊन येथील स्थानिक नागरिकांच्या व विद्यार्थ्यांच्या तसेच शाळेतील शिक्षकांच्या मदतीने वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी गावातील ज्येष्ठ नागरिकांनी विशेष भूमिका निभावली. येणाऱ्या काळामध्ये ही वृक्षारोपणाची मोहीम व्यापक केली जाणार असून बीड जिल्ह्यासह मराठवाड्यामध्ये दोन लाख झाडे लावण्याचे व त्यांचे सुव्यवस्थित संगोपन करण्याचे काम मंचाच्या माध्यमातून होणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

झाडे लावा झाडे जगवा ही मोहीम राबवून निसर्गाप्रती आपली कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी, त्याचप्रमाणे निसर्ग आपल्याला आधी-अनंत काळापासून मानवाच्या गरजा भागवत आलेला आहे. परंतु सध्य परिस्थिती पाहता, निसर्गाचे संतुलन पाहता, अतिवृष्टी व निसर्गाचा विकोप पाहता, मानवाने आपल्या स्वार्थासाठी निसर्गाची केलेली हानी भरून काढण्यासाठी सदरील संघटना पुढे सरसावली आहे. निसर्ग मित्र म्हणून प्रत्येकाने निसर्गासाठी आपले योगदान दिले पाहिजे. त्यामुळे येणाऱ्या काळामध्ये मराठवाड्यासह महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यामध्ये वृक्षारोपण करण्याची मोहीम सदरील मंचच्या माध्यमातून हाती घेण्यात आलेली असून यामध्ये जास्तीत जास्त नागरिकांनी आपला सहभाग नोंदवावा, असे शेतकरी जनहित कामगार मंचाचे संस्थापक अध्यक्ष माननीय श्री जयवंत कांबळे साहेब यांनी आवाहन केले आहे.



महाराष्ट्राच्या पर्यावरण व पशुपालन मंत्री ना. पंकजा मुंडे यांनी गेवराई विधानसभा मतदारसंघातील मौजे हिरापुर, धोंडराई या भागातील महापुरामुळे झालेल्या नुकसानीची पाहणी केली. यावेळी आ. विजयसिंह पंडित यांनी त्यांना झालेल्या नुकसानीची सविस्तर दिली.

## अरणविहरा परिसरातील नुकसानग्रस्त एकही शेतकरी वंचित राहणार नाही:सरपंच आण्णासाहेब शिरसाठ

दौलावडगाव:आठ दिवसांपासून पावसाने जोरदार हजेरी लावल्याने नदी,नाल्यांसह ओढ्याला मोठ्या प्रमाणावर पाणी आल्याने नदीकाठसह शेतातील पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.प्रशासनाकडून नुकसानीचे पंचनामे सुरू असून एकही नुकसानग्रस्त शेतकरी यापासून वंचित राहणार असे सरपंच आण्णासाहेब शिरसाठ यांनी सांगितले.त्यानी बुधवारी सकाळी परिसरातील शेतातील नुकसानीची पाहणी केली. आष्टी तालुक्यातील अरणविहरा,तागखेल, जोरदार ग्रुप ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या गावातील शेती पिकाचे पावसाने मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.

पान ४ वरून..

### पके सडली,नदीकाठी मातीच राहिली नाही पंचनामे करता कशाचे?

सरसकट मदत करावी, अशी मागणीही खा. बजरंग सोनवणे यांनी केली.

तर बीडमध्ये शरद पवारांच्या उपस्थितीत महामोर्चा- आ.शिंदे

यावेळी प्रदेशाध्यक्ष आ. शशिकांत शिंदे म्हणाले, बीड जिल्ह्यात शेतकरी बांधवांचे प्रचंड नुकसान झाले असून याअस्मानी संकटातून शेतकऱ्यांना सक्षमपणे उभे करण्या साठी ओला दुष्काळ जाहीर करावा,अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.परंतु सरकार शेतकऱ्यांच्या वेदनांकडे शासन लक्ष देत नसल्याचे चित्र समोर आल्याने प्रचंड आक्रोश शेतकरी बांधवांमध्ये आहे.सत्ताधाऱ्यांनी निवडणुकीपूर्वी दिलेल्या वचनाप्रमाणे शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करावा,ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना आधार द्यावा.राज्य सरकार व ठोस पाऊल उचलत नसेल तर सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या बरोबर राष्ट्रवादी काँग्रेस खांद्याला खांदा देऊन उभी राहणार आहे. नाशिकप्रमाणे बीडमध्ये सुद्धा पक्षाचे अध्यक्ष शरदचंद्र पवार यांच्या उपस्थितीत बीडमध्ये महामोर्चा काढला जाईल,अशी माहिती यावेळी आमदार शशिकांत शिंदे यांनी दिली.

=-------------------

### अनेक जिल्ह्यात घरफोड्या;पोलिसांना गुंगारा देणाऱ्या 'लाल्या'च्या बत्या गुल!

आहेत.गेल्या अनेक वर्षांपासून तो पोलिसाना चकवा देत फिरत होता.अखेर आष्टी पोलिसांनी त्याला जेरबंद करून 'लाल्या'च्या बत्या गुल केल्या आहेत. ही कामगिरी आष्टीचे उपअधीक्षक बाळकृष्ण हनपुडे याच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शरद भुतेकर, सहायक पोलीस निरीक्षक विजय नरवाडे,पोलीस हवालदार प्रवीण क्षीरसागर, मजरूद्दीन सय्यद, विकास जाधव, अशोक तांबे,बब्रुवाण वाणी,नागेश लोमटे,संतोष दराडे,सजगणे,होमगार्ड यांनी केली. प्रवीण,मजरूद्दीन जोडगोळीचे कौतुक! आष्टी पोलिस ठाणे हद्दीतील पाहिजे,फरारी व इतर घटनेतील आरोपीचा छडा लावून त्यांना पकडण्यात ठाण्यातील पोलीस हवालदार प्रवीण क्षीरसागर व अंमलदार मजरूद्दीन सय्यद या जोडगोळीचे मोठे यश असून त्याचे सध्या कौतुक होत आहे.

--------------------

### माजी मंत्री प्रा. सुरेश नवले यांनी प्रत्यक्ष बांधावर जाऊन केली नुकसानीची पाहणी

परिस्थिती अशी नाही याबाबत महसूल विभागाने त्यांच्या यंत्रणेमार्फत बीड जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये पावसाने रुद्रावतार धारण केलेले असून जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील छोटे मोठे नदी नाले आणि प्रमुख नद्यांनी पात्र सोडल्यामुळे शेकडो एकर जमीन पूर्णपणे खरडून गेल्याने असंख्य शेतकऱ्याकडे जमीनच शिल्लक राहिली नाही ज्यांची जमीन पूर्ण खरडून गेली सकस माती राहिली नाही मातीचा पोतही बदलला पूर्ण पाण्याने वाहून गेली याबाबत शासनाची नेमकी भूमिका काय आहे हा महत्त्वाचा मुद्दा आहे. यासोबतच शेतमालाचे, शेती अवजाराचे, घराचे, छोट्या मोठ्या व्यावसायिकांचे, निराधार / गोरगरीबांच्या घराचे, पाळीव प्राण्याचे, पाळीव पक्षाचे आणि सार्वजनिक मालमत्तेचे अतोनात नुकसान झाले आहे. याबाबत सत्य परिस्थितीवर आधारित पहाणी करून बीड जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांना, व्यापाऱ्यांना योग्य तो नुकसानीचा मोबदला देण्यासाठी पुनर्विचार करून सुधारित शासन निर्णय निर्गमित करून सबंध जिल्हावाशियांना शासनाने न्याय द्यावा अशी मागणी करून याबाबत शासनाकडे पाठपुरावा करणार असल्याचे माजी मंत्री प्रा. सुरेश नवले यांनी प्रतिनिधींशी बोलताना सांगितले. यावेळी शेकडो कार्यकर्त्यांसह प्रत्येक गावातील व्यवसायिक, शेतकरी, महिला, अबाल वृद्ध मोठ्या संख्येने उपस्थित होते.

--------------------

### त्र्यंबकेश्वर येथे पत्रकारावर झालेल्या भ्याड हल्ल्याचा निषेधार्थ तहसील

गुंड प्रवृत्तीच्या व्यक्तींनी जीवघेणा हल्ला केला. झी २४ तासचे ब्युरो चीफ श्री. योगेश खरे, साम टीव्हीचे ब्युरो चीफ श्री. अभिजित सोनवणे व पुढारी न्यूजचे ब्युरो चीफ श्री. किरण ताजने यांच्यावर स्वामी समर्थ केंद्राजवळील पार्किंगवर दगडफेक, लाथाबुक्के यांचा वापर करून भयंकर मारहाण करण्यात आली. राज्यात पत्रकारांवर वारंवार होणारे हल्ले ही लोकशाहीला काळिमा फासणारी बाब असून चौथ्या स्तंभावर घाला घालणारी धोकादायक प्रवृत्ती आहे. पत्रकार सत्य घटनांचा आवाज बनून अन्याय, भ्रष्टाचार व सामाजिक प्रश्न प्रकाशात आणण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेतात. अशा लोकांवर होणारे हल्ले ही असह्य व निंदनीय बाब आहे.त्यामुळे शासनाने तात्काळ सर्व हल्लेखोरांवर कठोर कारवाई करावी, पत्रकारांच्या सुरक्षेसाठी विशेष उपाययोजना राबवाव्यात तसेच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी ठोस व प्रभावी धोरण आखावे. यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई शाखा केज चे तालुकाध्यक्ष चंद्रकांत पाटील, उपाध्यक्ष प्रदीप गायकवाड, सचिव विजय बिक्कड, कार्याध्यक्ष नंदकिशोर मिसाळ, प्रसिद्धीप्रमुख पांडुरंग कसबे, पत्रकार हल्ला विरोधी समितीचे अध्यक्ष विश्वास राऊत, पत्रकार हिराचंद काळे, उपस्थित होते.

--------------------

### शिवणी ग्रामपंचायतीतून घरकुल योजना अभियंता बदलण्याची मागणी !

असल्याच्या चर्चा देखील शिवणी,पाली,मोची पिंपळगाव या गावातील ग्रामस्थ करत असून, जे लाभार्थी पैसे देतील त्यांचा धनादेश पाठवला जातो, परंतु जे पैसे देण्यास ता आढळतात किंवा घर बांधतात ते लाभार्थी पैसे देत नसल्याने त्यांच्या धनादेशासाठी आडवणूक केली जात आहे अशी माहिती मिळत आहे. या पार्श्वभूमीवर ग्रामपंचायत शिवणीने विद्यमान अभियंता धनवे साहेबांची बदली करून नवे व जबाबदार अभियंता नेमण्यात यावा, अशी मागणी केली आहे. धनवे अभियंता यांची बदली करावी म्हणजे गावातील अपूर्ण घरे वेळेत पूर्ण होतील आणि सामान्य नागरिकांची लूट होणार नाही व त्यांना दिलासा मिळेल,असा विश्वास ग्रामपंचायतीने व्यक्त केला आहे.

--------------------

### नुकसान ग्रस्तांच्या मदतीसाठी मा.आ.भिमराव धोंडे देणार १ महिन्याची पेंशन

पिकांचं अंदाजे ४०० ते ५०० कोटी रु चे नुकसान झाले असल्याचा अंदाज आहे.ज्या संपुर्ण जमिनी वाहून गेल्या आहेत.त्यांना हेक्टरी दोन लाख रूपये मदत तर ज्या शेतकऱ्यांच्या विहीरी बुजल्या आहेत.त्यांना पाच लाख रुपये अनुदान द्यावे.फळबागेसाठी २२ हजार रुपये मावेजा दिला जातो तो तुटपुंजा असून ५० हजार रुपये हेक्टरी फळबागेसाठी व तर इतर पिकांना ८ हजार ५०० रुपये सरसकट ऐवजी १७ हजार रुपये मावेजा हेक्टरी द्यावा,दोन हेक्टर ची अट रद्द करून शेतकऱ्याचा जेवढा सातबारा आहे.तेवढा मावेजा देण्यात यावा इतर राज्यांमध्ये ही अट नसून आपल्याकडेही इतर राज्यांप्रमाणे जेवढा सातबारा तेवढा मावेजा देवा.गाई म्हशींना दिला जाणारा मावेजा तुटपुंजा असून एक गाई असो किंवा म्हैस,बैल प्रत्येकी ७५ हजार रुपये मदत तर शेळी साठी प्रत्येकी १५ हजार रुपये मदत द्यावी तसेच अतिवृष्टीमुळे मृत्यू झालेल्या शेतकऱ्याच्या वारसाला तात्काळ शासनाने १० लक्ष रुपये मदत देण्यात यावी तसेच आष्टी मतदार संघात पुरग्रस्त स्थिती असून आणखी मोठ्या प्रमाणावर पाऊस पडत आहे.शासनाने नुकसान ग्रस्त भागाचे पंचनामे करण्यात वेळ घालण्यापेक्षा दिवाळीपूर्वी सर्व शेतकऱ्यांना मदत द्यावी व राज्यात ओला दुष्काळ जाहीर करावा व अतिवृष्टीचा इशारा असलेल्या भागात जीवित आणि वित्तहानी रोखण्याच्या दृष्टीनं ठोस पावलं उचलावेत असं ही बोलताना म्हणाले मा.आ.भिमराव धोंडे यांनी सांगितले आहे.

--------------------

### गेवराई शहराचा पाणीपुरवठा सुरळीत करा -शुभम घोडके

दिवसांनी होतो. त्यात पाण्याला दाब कमी असल्याने जेमतेम पाणीही मिळत नाही. नगरपरिषदेकडून होणारा पाणी पुरवठा रात्री-अपरात्री होत असल्याने गेवराईकरांची नाराजी आहे. शहरातील अनेक भागात व परिसरातील प्रभाग माऊली नगर ,सावता नगर ,भीम नगर, बाजार गल्ली, संजय नगर ,साठे नगर, राम मंदिर गल्ली, बोर्डे गल्ली, मेन रोड, कुरबू गल्ली, मोठे गल्ली, धनगर गल्ली, इस्लामपुरा या भागात पाणी तात्काळ सुरळीत करण्यात यावा

शहरात विभागवार पाणीपुरवठा केला जात आहे. मात्र, नगरपरिषदेने जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार पाणीपुरवठा होत नसल्याचे चित्र आहे. दिवसाआड पाणीपुरवठा सांगितला जातो. मात्र, तो आता दहा दिवस झाले तरीही होत नसल्याचे चित्र निर्माण आहे. शहरात विद्यार्थ्यांना शाळेत जावे, की पाण्यासाठी वाट पाहावी, अशा दुहेरी पेच निर्माण झाला आहे. विद्यार्थी, कामगार, महिला वर्गाची पाण्यावाचून कुचंबणा होत आहे. पाणीपट्टी आणि कर वेगळा भरूनही सुविधा नसल्याचे चित्र आहे.जलशुद्धीकरण आणि पाणी वितरणाबाबत पाणीपुरवठा विभागाने नियोजन नाही. नियोजनाचा अभाव आणि कर्मचाऱ्यांचा लहरीपणा, यामुळे नागरिकांना कृत्रिम पाणी टंचाईस सामोरे जावे लागत आहे. रात्री-अपरात्री केला जाणारा पाणीपुरवठा बंद करून उच्च दाबाने पाणी सोडावे अन्यथा नगरपरिषदेच्या समोर लोकशाही मार्गाने आंदोलन केले जाईल, असा इशारा यांनी दिला आहे.

--------------------

### ट्विंक्लिंग स्टार शाळेकडे जाणारा पूल झाला धोकादायक; विद्यार्थ्यांच्या जीवितास धोका

की, बीड शहरापासून लांब असलेल्या उत्तम नगर परिसरा पुढे कर्परा नदीच्या पलीकडे ट्विंक्लिंग स्टार स्कूल या शाळेकडे जाणारा कर्परा नदीवरील पूल अत्यंत धोकादायक स्थितीत आला आहे. पुलावरील रस्त्याचा काही भाग पाण्यात वाहून गेला असून मुख्य पुलाचा रस्ता जागोजागी खचला आहे. मोठमोठ्या भेगा पडल्यामुळे तसेच सध्या जोरदार पाऊस पडत असल्याने कर्परा नदीला आतापर्यंत अनेकदा पूर आलेले आहेत. पुलावरून सातत्याने पुराचे पाणी वाहत असल्याने हा पूल कधीही कोसळू शकतो. ट्विंक्लिंग स्टार शाळेकडे जाणारा हा एकमेव मार्ग असल्याने विद्यार्थ्यांची ने-आण करणाऱ्या शाळेच्या मोठ्या जड गाड्या याच पुलावरून ये-जा करतात. जर कधी पुलावरून शाळेची गाडी जात असताना हा पूल कोसळला तर मोठा अपघात होण्याची शक्यता आहे. विद्यार्थ्यांच्या जीवितास मोठ्या प्रमाणात धोका आहे. ही बाब लक्षात घेता हा पूल ज्यांच्या अखत्यारीत आहे मग ते जिल्हा प्रशासन, बीड नगर परिषद किंवा ग्रामपंचायत कोणीही असो संबंधित शासकीय-प्रशासकीय यंत्रणेने तांत्रिक बाबी जलद गतीने हाताळून ट्विंक्लिंग स्टार शाळेकडे जाणाऱ्या या पुलाच्या जागी नवीन उंच पुलाचे निर्माण करावे अशी मागणी मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी केली आहे.

--------------------

### अतिवृष्टीने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ नुकसान भरपाई देण्याची मागणी-दत्ता गव्हाणे

होते शरद चंद्र पवार पक्षाचे कार्यकर्ते कौवडगाव हुडा.बाबासाहेब गव्हाणे महाराज व गजानन भैया आचार्य. असे बरेच आंदोलन यावेळी जल आंदोलनास उपस्थित होते.

----------------------

### पवन करवर यांच्यावरील भ्याड हल्ल्याचा जाहीर निषेध - ॲड.सुभाष राऊत

काही जातीवादी गुंड ओबीसी समाजाच्या कार्यकर्त्यांवर हल्ला करीत आहेत. माजलगाव जवळ पवन करवर यांच्यावर झालेला जीवघेणा हल्ला, याच जातीवादी गुंडांचे काम असून या गुंडांना तात्काळ अटक करण्यात यावी अशी मागणी समता परिषदेच्या वतीने करण्यात आली आहे.

--------------------

### त्रिकुट सरकारच्या तिजोरीत ठणठणाट :

विसंगत दिसून येत असून, राज्याच्या तिजोरीत ठणठणाट असून, आत्ता केंद्राने या महापूर प्रलयाची दखल घेऊन शेतकरी राजाला सर्वोतोपरी भरीव मदत करावी अशी मागणी काँग्रेस नेते दत्ता कांबळे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकाद्वारे केंद्रसरकार कडे केली आहे.

तसेच ऐतिहासिक पूर नव्हे तर महाप्रलयाने बाधित जिल्ह्यातील शेतकऱ्यांना ५००० आणि धान्य अशी मदत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जाहीर करून, पैश्याच सोंग करता येत नाही असे वक्तव्य करून शेतकऱ्यांच्या जखमावर मीठ चोळण्याचे काम केले असून, उपमुख्यमंत्री अजित पवरांनी सत्तर हजार कोटी सिंचन करून ठेवलेल्या पैश्यातून,शेतकरी राजासाठी सात हजार कोटी जरी दिले तरी जगाचा पोशिंदा पुन्हा डोलाणे उभा राहिल तसेच सरकार पाडण्यासाठी पैश्याची गुहाटीत नाटक होतात परंतु शेतकरी म्हंटले की वेगवेगळे कारण समोर करायची म्हणजे शेतकऱ्यांना मदत करण्याची नीतिमत्ता आपल्याकडे आहे का असा खोचक सवाल त्रिकुट सरकार मधील नेत्यांना दिलेल्या प्रसिद्धी पत्रकाद्वारे काँग्रेसचे नेते दत्ता कांबळे यांनी त्रिकुट सरकारला केला आहे.

# सोमेश्वर मंदिरासमोरील नालीचे काम ठप्प;साकेत कन्स्ट्रक्शनचा भोंगळ कारभार उघड;सेंटर माप चुकल्याने दोन महिन्यापासून काम बंद

बीड(प्रतिनिधी)बीड शहरातील रस्त्यांची कामे सुरू असताना साकेत कन्स्ट्रक्शनचा भोंगळ कारभार पुन्हा एकदा समोर आला आहे. बार्शी रोडवरील सोमेश्वर मंदिरासमोर मागील दोन महिन्यांपासून नालीचे काम अपूर्ण अवस्थेत पडून आहे. जवळपास २०० ते ३०० फूट नाली खोदलेली असून या नालीसाठी खोदलेला खड्डा नागरिकांच्या त्रासाचे मुख्य कारण ठरत असून, अपघातांची शक्यता नाकारता येत नाही.

खड्डा अपघाताला आमंत्रण :

नालीसाठी मोठा खड्डा खोदून काम अर्धवट सोडले आहे. दिवसा तो दिसतो, मात्र रात्री खड्डा दिसत नसल्याने नागरिक, दुचाकीस्वार तसेच पादचारी यांना अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. याशिवाय, मोकाट जनावरे व श्वान यांच्यासाठीही हा खड्डा धोकादायक ठरू शकतो. स्थानिक रहिवाशांचा यावर संताप व्यक्त होत आहे.

मोजमापात गडबड; नागरिकांचा विरोध :

सुरुवातीला रस्त्याचे काम सुरू करताना इंजिनियरने योग्य मोजमाप न घेता जवळपास सहा फुटांचे अंतर सोमेश्वर मंदिराच्या दिशेने जास्त गेले होते.ही बाब स्थानिक नागरिकांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी काम त्वरित थांबवून सेंटर लाईनपासून दोन्ही बाजूंनी समान माप घेण्याची मागणी केली. त्यामुळे हे काम गेल्या दोन महिन्यांपासून ठप्प आहे. संबंधित इंजिनीयरने देखील मोजमाप चुकल्याचे मान्य करत दोबारा मोजमाप करण्याचे सांगितले परंतु दोन महिने उलटून देखील या नालीचे काम बंद असल्याने व सध्या पावसाचे दिवस असल्याने त्या खड्ड्यात पाणी साचत असून जीवितहानी होण्याचे शक्यता आहे.

तसेच समोर सोमेश्वर मंदिर असल्याने अनेक भावी भक्त मंदिरात दर्शनासाठी येत असतात यांना देखील या दिलेला खड्ड्याचा त्रास होत आहे.

दोन महिन्यांपासून काम ठप्प :

नाली काम ठप्प झाल्याने रस्त्याचे काम वेळेत पूर्ण झाले नाही, परिणामी नागरिकांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. बार्शी रोड हा शहरातील महत्वाचा मार्ग असून, वाहतुकीची प्रचंड वर्दळ असते. अशा वेळी रस्ता खड्ड्यात अडकलेला दिसत असल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

प्रशासनाकडे मागणी :

नागरिकांनी वारंवार प्रशासनाकडे तक्रारी नोंदवल्या आहेत. मात्र काम तातडीने सुरू करण्यासाठी कोणतीही ठोस उपाययोजना झालेली नाही. अपघात होण्यापूर्वी प्रशासनाने जागे होऊन योग्य ती कारवाई करावी,अशी जोरदार मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे. राष्ट्रवादी भवन,बार्शी नाका ते तेलगाव नाका या रस्त्यावर अनेक ठिकाणी तडजोड करून रस्ता पाच फुटापर्यंत कमी झाला असल्याची चर्चा असून संबंधित इंजिनियर तोडपाणी करत असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. यामुळे त्या इंजिनीयरने बापात पाप करू नये अशी मागणी नागरिकातून होत आहे.

*माजी मंत्री बदामराव पंडित धावले पूरग्रस्तांच्या मदतीला*

## गेवराई तालुक्यातील ग्रामीण भागातील पूर परिस्थितीची पाहणी



गेवराई (प्रतिनिधी):- महाराष्ट्र राज्याचे माजी ग्रामविकास मंत्री बदामराव पंडित यांनी मंगळवार (दि.२३) गेवराई विधानसभा मतदार संघातील पुरग्रस्त भागाची पाहणी केली. तालुक्यातील माजी मंत्री लोकनेते बदामराव पंडित यांनी

गेवराई विधानसभा मतदार संघातील हिरापुर, खामगाव, नांदुर हवेली, यांच्या सह अनेक गावांमध्ये मुसळधार पावसामुळे शेतकरी आणि नागरीकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.या भागात पाहणी करून नुकसानग्रस्तांना चौकशी करून शिवारातील शेतकरी व ग्रामस्थांशी संवाद साधत त्यांनी त्यांना धीर दिला. गेवराई तालुक्यात धुवाधार पाऊस झाल्यामुळे अतिवृष्टी आणि जायकवाडी धरणातून सोडण्यात आलेल्या अतिरिक्त पाण्यामुळे गेल्या काही दिवसांत गोदाकाठच्या गावांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागले. अनेक गावांचा संपर्क तुटला असून शेतजमिनी, घरे व पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. सव्वा लाख क्युसेस पाणी नदीपात्रात सोडले गेले की, परिसरातील अनेक गावांवर संकट ओढवते. जोडरस्त्यांवरील पुलांची उंची वाढविणे आणि पुररेषेत येणाऱ्या कुटुंबांचे पुनर्वसन करणे ही मागणी ग्रामस्थांकडून गेल्या अनेक वर्षांपासून होत आहे.दरम्यान पुरस्थितीतील समस्यांकडे गांभीर्याने पाहिले जात आहे. ग्रामस्थांचे पुनर्वसन, रस्त्यांची उंची वाढविणे आणि शेतकऱ्यांना झालेल्या नुकसानीची योग्य ती दखल घेण्यासाठी शिवसेना नेते बदामराव पंडित शासन दरबारी प्रयत्नशील राहतील असे त्यांनी सांगितले.

गेवराई तालुक्यात रविवारी रात्री व सोमवारी पहाटे झालेल्या मुसळधार पावसाने भीषण परिस्थिती निर्माण झाली आहे. परिसरातील वस्त्यांमध्ये पाणी शिरले. या ठिकाणी प्रशासन व नागरिकांच्या मदतीने नागरिकांना सुरक्षित स्थळी हलविण्यात आले. पूरस्थिती गंभीर झाल्याने तालुक्यातील ग्रामीण भागाच्या परिसरात धुमाकूळ घातला.

## शुक्रवार दिनांक २६ सप्टेंबर रोजी क्रांतीनगर भागातील नागरिकांचा रस्ता रोको आंदोलन

केज (प्रतिनिधी):- तहसीलदार केज यांना झोपडपट्टी हक्क संघर्ष समितीच्या वतीने निवेदन सादर करण्यात आले.या निवेदनामध्ये क्रांतीनगर,कानडी रोड येथे १९८३- १९८४ पासून शासनाने ९१ व ९५ असे १८६ घरे निराधार,भूमिहीन,बेघर, अनुसूचित जाती जमाती,भटक्या विमुक्त जाती जमाती, अल्पसंख्यांक लोकांना एक गुंठा जागा व पाच पत्रांचे घरकुल बांधून वाटप करून कबाली पत्रक म्हणजेच मालकी हक्क दिलेली होती, परंतु गेल्या ४० वर्षात कुटुंबातील संख्या वाढल्याने क्रांतीनगर वसाहतीत पाचशे ते सहाशे घरे झालेले आहेत.तरी कुटुंबसंख्या वाढल्याने दीड ते दोन गुंठे जागा देऊनमालकी हक्क देण्यात यावा तसेच सर्व नागरीसुविधा या झोपडपट्टी धारकांना देण्यात याव्यात यासाठी सदरील निवेदन सादर करण्यात आले. क्रांतीनगर येथील विठ्ठल मंदिर,महात्मा फुले सभागृह, सत्यशोधकअण्णाभाऊ साठे सभागृह, अंगणवाडी,जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह



यांची जागा मोजून नगरपंचायत केज अभिलेखात नोंद करण्यात यावी.वरील सर्व सभागृह,शाळा व अंगणवाडी यांची त्वरित दुरुस्ती करण्यात यावी. यश कंट्रक्शन कंपनीने अपूर्ण ठेवलेले काम तात्काळ करण्यात यावे क्रांतीनगर वसाहतीत जुने रस्ते व नाल्या तत्काळ दुरुस्तकरण्यात याव्यात,तसेच मुस्लिम समुदायाकरिता कब्रस्तानासाठी जागा देण्यात यावी,नवीन पाईपलाईन टाकून पिण्याच्या पाण्याची सोय करावी.वसंत महाविद्यालयासमोर सीसीटीव्ही बसवण्यात यावा,रमाई घरकुल योजना,पंतप्रधान आवास योजना या घरकुला योजनेतील पहिला व दुसरा हप्ता तात्काळ देण्यात यावा, अपंग,संजय गांधी निराधार योजना,श्रावण बाळ योजना नागरिकांची केवायसी होत नसल्याने पर्यायी व्यवस्था करून बंद झालेल्या पगारी पुन्हा सुरू करण्यात याव्यात. तसेच क्रांतीनगर येथे मंजूर असलेले स्वस्त धान्य दुकान क्रांतीनगर भागातच सुरू करण्यात यावे.याकरिता जिल्हाधिकारी साहेब, उपजिल्हाधिकारी साहेब,तहसीलदार साहेब तहसीलदार केज तसेच मुख्याधिकारी साहेब नगरपंचायत कार्यालय केज,पोलीस निरीक्षक साहेब पोलीस ठाणे केज यांना माहितीस्तव सादर करण्यात आले.सदरील निवेदनावर बाबुराव गालफाडे सर,लक्ष्मण जाधव,इरफान पठाण, अनिल लोखंडे,महादेव लांडगे,शितलताई लांडगे,योगेश गायकवाड,अजय गालफाडे,आरेफ खुरेशी,नागेश जावळे, भीमा हजारे इत्यादींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## म्हाळस जवळा महसूल मंडळ गावांची अतिवृष्टीनुकसान ग्रस्त यादीत समावेश करण्यात यावा




बीड (प्रतिनिधी):- मागील दि १७ सप्टेंबर ते २३ सप्टेंबर कालावधीत दरम्यान अतिवृष्टी यादीत म्हाळस जवळा महसूल मंडळ मधील गावांचा समावेश करण्यात आलेला नाही. शासनाचे पर्जन्यमापक यंत्र नादुरुस्त असल्यामुळे अतिवृष्टी यादीत म्हाळस जवळा महसूल मंडळ मधील म्हाळस जवळा, पिंपळगाव मांजरा, सज्जा,खांडे पारगाव, अंथरवन प्रिंपरी, गणपूर, अंथवन प्रिंपरीतांडा उमरद खालसा,सज्जा, ईट सज्जा, म्हसापूर, गंगनाथवाडी,नागपूर खुर्द सज्जा, नागपूर बुद्रुक, उमरी,गुंदा सज्जा, वडगाव सज्जा, गुंजाळा, गुदावाडी या गावामध्ये अतिवृष्टी झाली असून पर्जन्यमापक यंत्र नादुरुस्त असल्यामुळे या गावात अतिवृष्टी होऊनही हि गाव वगळण्यात आली आहे ती तत्काळ अतिवृष्टी यादीत समावेश करण्यात यावा अन्यथा सर्व गावातील शेतकरी तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा जिल्हा कृषी अधिकारी साळवे साहेब व नायब तहसीलदार हजारे यांना निवेदन देऊन देण्यात आला या वेळी गणपत डोईफोडे जी प सदस्य, राजेंद्र आमटे, महादेव गव्हाणे, माऊली खांडे, रमेश कानडे, मच्छिंद्र जामकर, विजय माने, रामचंद्र बरडे, मंगेश खांडे, अजय राऊत, वैजीनाथ नागरगोजे, कल्याण चेन्न, वसंत जामकर, आदींच्या वतीने निवेदन देण्यात आले अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येणार असा इशारा देण्यात आला

## बीड जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत करा-बाळासाहेब सोनटक्के



धारुर (प्रतिनिधी) आठ दिवसापासून झालेल्या अतिवृष्टी मुळे खरिप हंगामातील पिकांचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी पिके पाण्याखाली गेले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना प्रचंड प्रमाणात आर्थिक फटका बसला असल्याने शासनाने ओला दुष्काळ जाहीर करून तातडीने आर्थिक मदत करावी अशी मागणी सत्यशोधक ओबीसी परिषदेचे धारुर ता. अध्यक्ष बाळासाहेब सोनटक्के यांनी केले आहे.

सलग आठ दिवस अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील नदी नाले तुडुंब भरले आहेत, नदी नाल्याचे पाणी शेतात शिरल्याने तलावाचे स्वरूप आले आहे.ऐन भरात आलेली पिके आता पदरातच पडणार होते मात्र शेतकऱ्याचा तोंडातला घास निसर्गाने हिराहून घेतला आहे त्यामुळे शेतकऱ्यांच्या मेहनतीवर अक्षर शः पाणी फिरले आहे कापूस सोयाबीन हे नगदी पिके आहेत नगदी पिके घेऊन त्यातून निघणाऱ्या उत्पन्नातून कुटुंबाचा जगण्याचा प्रश्न सुटेल म्हणून शेतकऱ्यांनी बी बियाणे खाते औषध यावर मोठ्या प्रमाणात खर्च केला होता मात्र तेलही गेले आणि तूपही गेले अशी अवस्था शेतकऱ्याची झाली आहे त्यामुळे शासनाने शेतकऱ्याचा सहानुभूतीपूर्वक विचार करून शेतकऱ्यांना कोसळलेल्या संकटांमधून तातडीने बाहेर काढावे यासाठी ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर आर्थिक मदत पाठवावी अशी मागणी सत्यशोधक ओबीसी परिषदेचे धारूर तालुका अध्यक्ष बाळासाहेब सोनटक्के यांनी शासनाकडे केली आहे

## धोंडराईत नियम मोडल्याने डीजेवर गेवराई पोलिसांची धडक कारवाई




गेवराई (प्रतिनिधी):- धोंडराई गावातील दुर्गा उत्सवाच्या स्वागत मिरवणुकीत डीजे वाजवून नियमभंग करणाऱ्यांवर गेवराई पोलिसांनी कडक कारवाई केली आहे. पोलीस प्रशासनाने स्पष्टपणे बंदी घातलेली असतानाही डीजे वाजवल्यामुळे पोलिसांनी तातडीने त्याठिकाणी जाऊन डीजे जप्त केला तसेच चालकावर गुन्हा दाखल केला. शंभूराजे दुर्गा उत्सव समितीच्या वतीने तुळजापूरहून धोंडराई येथे आणलेल्या ज्योत दिंडीच्या स्वागतासाठी भव्य नियोजन करण्यात आले होते. मात्र २२ सप्टेंबर रोजी संध्याकाळी ५ वाजता विराज ७७ धोंडराईकर या नावाचा डीजे गावात कर्णकर्कश आवाज करत असल्याची माहिती पोलिसांना मिळताच त्यांनी तात्काळ धडक कारवाई केली. एमएच ०४ ऋक्ष ७७५७ या क्रमांकाचे वाहन पोलिस स्टेशनमध्ये जमा करण्यात आले असून त्याची कागदपत्रे तपासून पुढील दंडात्मक कारवाई केली जाणार असल्याचे सांगण्यात आले.

गेवराई पोलिस प्रशासनाचा इशारा!

धार्मिक, सांस्कृतिक किंवा लग्न समारंभ अशा कोणत्याही कार्यक्रमात नियम मोडून डीजे वाजवणाऱ्यांवर अशीच कठोर कारवाई करण्यात येईल. वेळेचे व आवाजाचे बंधन मोडून कर्कश डीजे संस्कृती फोफावू देणार नाही, असा इशाराही पोलिसांनी दिला आहे. शांततेचा भंग करणाऱ्या डीजे चालकांवर कारवाई सुरूच राहणार आहे.

## माजलगाव तालुका १०० % ओला दुष्काळ जाहीर करा. - डॉ संजय नाकलगावकर




माजलगाव (प्रतिनिधी ) माजलगाव तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून ढगफुटीसदृश्य पाऊस झालाय. हजारो हेक्टर शेती पाण्याखाली गेली आहे. अनेकांचे संसार उध्वस्त झाले आहेत . घरादारांचे मोठे नुकसान झाले असून अनेक जनावरे दगावली आहेत . शासनाने तात्काळ पंचनामे करून ओला दुष्काळ जाहीर करावा शेतकऱ्यांना खालील शासकीय मदत त्वरित देण्यात यावी यामध्ये :- पीक विमा / नैसर्गिक आपत्ती मदत -३३ टक्क्यांपेक्षा अधिक नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना आर्थिक देण्यात यावी . -कर्जमाफी / कर्ज मोर्टोरिअम - पीक कर्ज फेडण्यास मुदतवाढ किंवा कर्जमाफी देण्यात यावी -महसूल वसुली स्थगिती - सरकारी महसूल वसुली (वीज, पाणीपट्टी, कर) काही काळांसाठी थांबवली जावी किंवा २०२५-२६ रद्द करण्यात यावी . -नुकसान भरपाई - घर जनावर विहिरी शेततळे पीक साठा यांचे नुकसान भरून काढण्यासाठी थेट अनुदान देण्यात यावे . -महात्मा गांधी रोजगार हमी योजना (एऋड) -ग्रामीण भागात रोजगाराची हमी वाढवण्यात यावी . - चारा छावण्या, तात्पुरता निवारा, अन्नधान्यांची मदत, आरोग्य शिबिरे अशी मदतही पुरवली जाव्यात . अशी मागणी वंचित बहुजन आघाडीचे मा तालुकाध्यक्ष डॉ संजय नाकलगावकर यांनी वंचितच्या वतीने दिलेल्या निवेदनत म्हटले आहे.

## फिरदोस पठाण यांची मुस्लिम सेवा संघ महाराष्ट्र प्रदेश सचिव पदी नियुक्ती



बीड (प्रतिनिधी):- येथील समाजसेवक,खीदमत जनाधिकार सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष, आयडियल कोचिंग क्लासेसचे चेअरमन, आधार अभिनव संस्थेचे संस्थापक, साहेबा कलेक्शनचे मालक फिरदोस पठाण हे समाज उपयोगी कार्यात नेहमीच अग्रेसर असतात, अजात शत्रू असे व्यक्तिमत्व असणारे, आदर्श शिक्षक फिरदोस पठाण सर यांच्या कार्याची दखल घेऊन मुस्लिम सेवाभावी संघटनेने त्यांची राज्य सचिवपदी नियुक्ती केल्याबद्दल सर्व स्तरातून अभिनंदनचा वर्षाव होत आहे. त्यांच्या या निवडीचा सर्व समाजातील तळागळातील लोकांना नक्कीच फायदा होईल यात तीळ मात्र शंका नाही, फिरदोस पठाण च्या निवडीमुळे अनेक मातब्बर अनुभवी लोक मुस्लिम सेवाभावी संघटनेच्या चळवळीत आपला सहभाग नोंदवण्यासाठी तत्पर झाले आहेत. त्यांच्या निवडीबद्दल रियाज सिद्दिकी जिल्हा कृषी विभाग प्रतिनिधी, पत्रकार फहीम इनामदार , सोहेल सर, बबर पठाण, आदर्श शिक्षक तथा पत्रकार फारुक मणियार, एम एम शेख, जमिर पठाण, शिरीन शेख, साजिया शेख, राणी मॅडम, जिल्हाध्यक्ष जाकिर पठाण, सुप्रसिद्ध शायर वसी पठाण यांनी शुभेच्छा दिल्या.

## धनेगाव येथे आरोग्य तपासणी शिबिर संपन्न ; १४० नागरिकांची तपासणी



केज (प्रतिनिधी):- स्वस्थ नारी, सशक्त परिवार अभियानांतर्गत आरोग्य वर्धिनी केंद्र, धनेगाव येथे आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिराचे उद्घाटन गावच्या सरपंच आकांक्षा गुजर यांच्या हस्ते संपन्न झाले. या शिबिरात समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. स्वप्नील गोरमाळी यांनी असंसर्गजन्य आजार तपासणी, गरोदर मातांची तपासणी, हेमोग्लोबिन तपासणी तसेच विविध आजारांवर मार्गदर्शन व समुपदेशन केले.दिवसभरात एकूण १४२ नागरिकांची मोफत तपासणी करण्यात आली. शिबिरात एम.पी.डब्लू मनियार कैफ, ज्योती सोनवणे संध्या मुजमुले उषा इंगळे अर्चना मोरे या आशा कार्यकर्त्या यांच्यासह गावातील नागरिक महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नवसाला पावणाऱ्या अंबाचोंडी देवीच्या यात्रेला सोमवार पासून सुरुवात



धारूर (प्रतिनिधी):- धारूर शहराच्या पश्चिमेला तीन किलोमीटर अंतरावर डोंगराच्या कुशीत आंबाचोंडीदेवीचे मंदिर आहे शारदीय नवरात्र सुरुवात आश्विन शुक्ल पक्ष प्रतिपदा दि.२२ सप्टेंबर सोमवार पासून सुरुवात झाली आहे त्यामुळे नवसाला पावणाऱ्या आंबाचोंडी देवीच्या दर्शनासाठी पुढील नऊ दिवस मोठ्या संख्येने भक्त येणार असल्याने मंदिराला रंगरंगोटी व फुलांच्या हराची सजवट करून रोशनाई करण्यात आली आहे.

किल्ले धारूर शहराच्या पश्चिमेला तीन किलोमीटर अंतरावर घाट रस्ता ओलांडून गेल्यानंतर चौवबाजूने उंच उंच असलेल्या डोंगराच्या कुशीत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी जीर्णोद्धार केलेले श्री शेत्र आंबाचोडी देवीचे मंदिर आहे मंदिराच्या पायथ्याशी पश्चिमेकडून पूर्वेकडे खळखळ वाहणारी नदी आहे तसेच मंदिर परिसरात निसर्ग रम्य वातावरण आहे बारा महिने या ठिकाणी भाविक भक्त दर्शनासाठी येतात विशेषता नवसाला पावणारी देवी असल्याने आंबाचोंडीदेवीच्या भक्तांची संख्या मोठी आहे त्यामुळे परराज्यातून देखील भाविक भक्त वर्षातून एकदा होणाऱ्या शारदीय नवरात्रमध्ये या ठिकाणी दर्शनासाठी येतात दि २२ सप्टेंबर पासून शारदीय नवरात्रेला सुरुवात झाली असून आंबाचोडी देवीच्या मंदिराला रंगरंगोटी करण्यात आली असून मंदिराच्या चव बाजूने फुलांच्या हराने मंदिर सजवून मोठ्या प्रमाणावर रोशनाई करण्यात आली आहे. मंदिर परिसरामध्ये चहापाण्याची हॉटेल नागरिकांनी थाटले असून पुढील नऊ दिवस येणाऱ्या भावी भक्तांची कसल्याही प्रकारची गैरसोय होणार नाही याची दक्षता घेतली जाणार आहे तसेच पोलीस प्रशासनाच्या वतीने देखील काही कर्मचारी या यात्रेदरम्यान अनुसूचित प्रकार घडू नये म्हणून नेमण्यात आली आहेत.

## शाहू माध्यमिक विद्यालयात शैक्षणिक साहित्य वाटप करून केला राष्ट्रीय चर्मकार महासंघाचा वर्धापन दिन साजरा- नानासाहेब घोडके



माजलगाव (प्रतिनिधी):- राष्ट्रीय चर्मकार महासंघ शाखा माजलगाव वतीने शाहु माध्यमिक विद्यालय पात्रुड येथे शैक्षणिक साहित्य व विद्यार्थ्यांना खाऊ वाटून राष्ट्रीय चर्मकार महासंघाचा तीसवा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला या कार्यक्रमाची सुरुवात महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करून माणिक राधाकिसन घोडके यांना श्रद्धांजली अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली या कार्यक्रमाचे उद्घाटक कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव मा हरिभाऊ सावने, कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून व्यापारी महासंघ तालुका अध्यक्ष सुरेंद्र रेदासानी तर तर प्रमुख पाहुणे म्हणून महादेव सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष मा सितारामजी सोनवणे व राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे जिल्हा अध्यक्ष नानासाहेब घोडके तसेच युवा जिल्हाध्यक्ष राजेश अण्णा जाधव तालुकाध्यक्ष सुभाष कांबळे कार्यक्रमासाठी उपस्थित होते या कार्यक्रमाचे विशेष सत्कारमूर्ती म्हणून रोटरी क्लब ऑफ माजलगाव यांच्या वतीने आदर्श शिक्षक पुरस्कार मिळालेले श्री वाडेकर सर यांचा महासंघाच्या वतीने सत्कार करण्यात आला

या कार्यक्रमाचे उद्घाटक श्री हरिभाऊ सावने यांनी आपल्या भाषणामध्ये श्री संत गुरू रविदासांचे विचार तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे योगदान याबद्दल मार्गदर्शन केले तसेच जिल्हाध्यक्ष नानासाहेब घोडके यांनी राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या उभारणीमध्ये महासंघाचे संस्थापक अध्यक्ष बबनरावजी घोलप साहेब यांच्या कार्याचा उल्लेख करत तळागाळातील लोकांना गटई कामगारांना पत्र्याचे स्टॉल व विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा समाज कल्याण विभागाच्या मार्फत उपलब्ध करून दिल्याचे विवेचन आपल्या भाषणामध्ये प्रस्ताविकामध्ये नानासाहेब घोडके यांनी केले.

# पके सडली, नदीकाठी मातीच राहिली नाही पंचनामे करता कशाचे ?

## खा.बजरंग सोनवणे यांचा सवाल, राष्ट्रवादीच्या प्रदेशाध्यक्षासोबत बांधावर जावून केली नुकसानीची पाहणी



बीड (प्रतिनिधी):- दहा दिवसांपासून जिल्ह्यात अतिवृष्टी होत आहे.यामुळे नद्यानाल्यांना महापूर गेला.परिणामी,पाण्या मुळे पिके सडली आहेत अनेक ठिकाणी मातीही खरडून गेली आहे.अशा वेळी पंचनामे कशाचे करता,असा सवाल खा.बजरंग सोनवणे यांनी उपस्थित केला. शिवाय ओला दुष्काळ जाहिर करून सरसकट मदत द्या,अशी मागणी ही त्यांनी केली आहे.

राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष आ.शशिकांत शिंदे हे बीड जिल्ह्यातील अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांच्या भेटीसाठी आणि नुकसान पाहणी साठी दौऱ्यावर आले होते.यावेळी खा.बजरंग सोनवणे,आ.संदिप क्षीरसागर,जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के,माजी आ. सलीम भाई,मेहबूब शेख,उषाताई दराडे, सुशीलाताई मोराळे आदी प्रमुखपदाधिकारी सकाळ पासूनच या दौऱ्यात सहभागी होते. बीड तालुक्यातील पिंपळवाडी,दत्तनगर, बेलखंडी,नागझरी, शिरापूर गात,शिरूर, आर्वी,नवगण राजुरी येथील व्यापारी व आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांशी संवाद साधला.यावेळी पुढे बोलताना खा.बजरंग सोनवणे म्हणाले की, बीड जिल्ह्यात दहा दिवसातून किमान पाच दिवस अतिवृष्टी झाली आहे.शिरूरतालुक्यातून वाहणारी सिंदफणा, पाटोदा तालुक्यातून वाहणारी मांजरा नदीने रौद्ररूप धारण केले होते.नदीकाठी असलेल्या गावात पाणी शिरले.शेतातील पिके, जमीन,विहीरी डोळ्या देखत वाहून गेल्या. कधी नव्हे इतके पाणी नागरिकांनी पाहिले. जिल्ह्यात जवळपास साडेतीनशे कोटींचे शासकीय मालमत्तेचे नुकसान झालेले आहे. तर शेतकऱ्यांचे, व्यापाऱ्यांचे नुकसान किती असेल,याचा अंदाज येत नाही.यामुळे सरकारने पंचनामे करत बसण्यापेक्षा ओला दुष्काळ जाहिर करून पान २ वर...

## नुकसानीचे पंचनामे करून शेतकऱ्यांना दसरा व दिवाळीच्या आधी तात्काळ मदत करा-अशोक कुताळ



पिंपळा (प्रतिनिधी):- आष्टी तालुक्यातील सर्व मंडळासह परिसरातील भागात गेल्या काही दिवसापासून मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्यामुळे शेती पिकाचे मोठे नुकसान झाले आहे नुकसान झालेल्या पिकाचे तात्काळ पंचनामे करून दसरा व दिवाळीच्या आधी शेतकऱ्यांना आर्थिक मदत करावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते व युवा नेते.अशोक कुताळ यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे मागणी केली आहे.सततच्या पावसामुळे शेतामधील कांदा पीक अक्षरशः निस्तनाबूत झाले आहे.सोयाबीन.कापूस.मूग.उडीद.बाजरी या पिकास अन्य पिकांना सुद्धा हानी पोहोचलेली आहे.काही शेतकऱ्यांचे मुग व उडीद पीक हाताशी आलेले पीक पावसाळा मोठ्या गेले अशी परिस्थिती झाली आहे.सततच्या पावसामुळे मोठ्या प्रमाणात शेती पिकाचे नुकसान झाले आहे.तसेच फळबागांना देखील या पावसामुळे मोठ्या प्रमाणात फटका बसलेला आहे.सततच्या पावसामुळे नुकसान झाल्यामुळे संपूर्ण शेतकऱ्यांची पिकाचे पंचनामे करून तात्काळ शेतकऱ्यांना दसरा व दिवाळीच्या आधी मदत करावी.अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते. अशोक कुताळ यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.

## त्रिकुट सरकारच्या तिजोरीत ठणठणाट : केंद्र सरकार ने शेतकऱ्यांना भरीव मदत करावी-दत्ता कांबळे



माजलगाव : ( प्रतिनिधी ): मराठवाड्यात सातत्याने ढगफुटी सदृश्य पाऊसाने थैमान घातलं असून, बीड, धाराशिव, सोलापूर, जालना सह राज्यातील इतर भागात पूर परिस्थिती निर्माण झाली आहे.

सदरील परिस्थितीत विविध नद्यांनी आपले पात्र सोडून एक ते दीड किलोमीटर पाण्याने वळण घेऊन जनजिवन विस्कळीत झाले असून, शेतकरी वर्ग पुरता उद्धवस्त झाला असून, सामान्य मजूरांची घरे व जीवनावश्यक वस्तूंचे प्रचंड नुकसान झाले आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वक्तव्यावर काँग्रेस अनु जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे यांनी जोरदार समाचार घेतला असून, राज्यातील त्रिकुट सरकार मध्ये सामील असणाऱ्या तिन्ही पक्षातील नेत्यांची शेतकरी मदतीला घेऊन प्रचंड पान २ वर...

## अनेक जिल्ह्यात घरफोड्या ;पोलिसांना गुंगारा देणाऱ्या 'लाल्या'च्या बत्या गुल!

### आष्टी पोलिसांच्या कामगिरीचे होतेय कौतुक



दौलावडगाव (प्रतिनिधी):- दहा जिल्ह्यातील पोलिसांना हवा असलेला व घरफोड्या करून पोलिसांची झोप उडवणारा,शंभर गुन्हे दाखल असलेला अट्टल गुन्हेगार 'लाल्या' च्या आष्टी पोलिसांनी बत्या गुल केल्या आहेत. रात्री त्याच्यावर झडप घालून मुसक्या आवळल्या आहेत.आष्टी पोलिसांच्या कामगिरीचे कौतुक होत आहे. आष्टीसह बीड,पुणे,सोलापूर, अहिल्यानगर, सांगली आणि अन्य जिल्ह्यात घरफोड्या करून पोलिसांना कायम गुंगारा देत पसार असणारा अट्टल घरफोड्यातील सराईत गुन्हेगार लाल्या उर्फ सोन्या ईश्वर भोसले वय वर्ष ३२ याला आष्टी पोलिसांनी ठाणे हद्दीतील आंधळेवाडी येथील पारधीवस्तीवर रात्रीच्या दरम्यान सापळा रचून मोठ्या शिताफीने जेरबंद केले.लाल्या भोसलेवर आठ ते दहा जिल्ह्यात घरफोडीसह विविध गुन्हे दाखल पान २ वर...

## नुकसान ग्रस्तांच्या मदतीसाठी मा.आ.भिमराव धोंडे देणार १ महिन्याची पेंशन



आष्टी पिंपळा (प्रतिनिधी):- विधानसभा मतदार संघातील २१ महसूल मंडळात अतिवृष्टीमुळे एक लाख एकर पेक्षा जास्त पिकांचं मोठे नुकसान झाले असून जमिनी खरडुन गेल्या आहेत.पिके पाण्याखाली गेली, घरे पाण्याखाली गेली व पशुधन दगावले.५ नागरीकांचा मृत्यू झाला सर्व च मंडळात अतिवृष्टी झाली असून शेतक-यांचा दिवाळी पूर्वी शिमगा झाला आहे.बळीराजाची आयुष्यभराची कमाई या पुराने वाहुन गेली आहे.माझ्या आयुष्यात पहिल्यांदाच आमच्या भागात पावसाने थैमान घातलेले पाहिले आहे.या बळीराजाला उभारी देण्यासाठी दिवाळी पूर्वी ज्या संपुर्ण जमिनी वाहून गेल्या आहेत त्यांना हेक्टरी दोन लाख रूपये मदत फळबागांना हेक्टरी ५० हजार रुपये इतर पिकांना हेक्टरी १७ हजार रुपये बुजलेल्या विहीरींना ५ लाख रुपये २ हेक्टर अट रद्द करुन जेवढा सातबारा तेवढा मावेजा,मयत व्यक्तीच्या वारसांना १० लाख रुपये मदत तात्काळ देण्याची मागणी.मा.आ.भिमरावजी धोंडे यांनी आष्टी येथील भगवान महाविद्यालयात मंगळवारी सायं ६.३० वा. आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत केली.यावेळी त्यांनी नुकसान ग्रस्त भागातील नागरिकांना मदत म्हणून १ महिन्याची पेंशन देणार असल्याचे सांगितले पुढे बोलताना मा.आ.भिमराव धोंडे म्हणाले की आष्टी विधानसभा मतदार संघातील २१ महसूल मंडळात मी पाहणी केली असता अतिवृष्टीमुळे एक लाख एकरापेक्षा जास्त पान २ वर...

## गेवराई शहराचा पाणीपुरवठा सुरळीत करा -शुभम घोडके



गेवराई (प्रतिनिधी) मागील काही दिवसापासून होणारा पाणी पुरवठा वारंवार खंडीत होत असून पाणी पुरवठा विभागाचा निष्काळजीपणा अखेर उघडकीस आल्याचे दिसून येत आहे.शहरात विविध नागरी समस्यांना शहरवासियांना तोंड देत आहे. पण प्रशासन मात्र कोणतीही कारवाई करीत नाही. रस्ते खराब झाले आहेत. दोन- तीन दिवसांच्या पावसाने सावता नगर ,दत्त नगरी या भागातील नागरिकांच्या घरात पाणी शिरले. पाणीपुरवठा व्यवस्थित नाही. पाणीपुरवठा गेल्या दहा दिवसापासून पाणीपुरवठा विस्कळीत झाला आहे. नगरपरिषद प्रशासनाला वारंवार निवेदने देऊनही पाणीपुरवठा सुरळीत होत नाही. नागरिकांचे प्रचंड हाल होत आहेत. गेवराई शहरातील सर्व भागातील पाणीपुरवठा तात्काळ सुरळीत करावा, महाराष्ट्र राज्याचे पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांच्याकडे रीतसर शुभम घोडके यांनी लेखी तक्रार दाखल केली आहे.शहरात आधीच दिवसाआड पाणीपुरवठा होण्याऐवजी तो दोन पान २ वर...

## माजी मंत्री प्रा. सुरेश नवले यांनी प्रत्यक्ष बांधावर जाऊन केली नुकसानीची पाहणी



बीड (प्रतिनिधी):- आज माजी मंत्री प्रा. सुरेश नवले यांनी अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या उमरद जहांगीर, पारगाव शिरस, सोनगाव, साक्षर पिंपरी, पौंडूळ, खांबा, लिंबा, खलापुरी, जांब, आर्वी, तरडगव्हाण, गाजीपुर, हाजीपुर गावासह इतरही गावांची प्रत्यक्ष बांधावर जाऊन पाहणी केली असता अतोनात नुकसान झाल्याचे पाहून वेदना झाल्याचे सांगितले.

बीड जिल्ह्यात एकूण ११ तालुके असून शासन निर्णयामध्ये बाधित शेतकऱ्यांची संख्या ११४७७३ म्हणजे सरासरी एका तालुक्यात फक्त आणि फक्त १०००० शेतकरीच या अतिवृष्टीमध्ये बाधित झालेले दिसून येत असून संपूर्ण जिल्ह्यासाठी फक्त ५६.७३ कोटी तुटपुंजा निधी मंजूर केला आहे तो जिल्ह्यातील लाखो नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसल्याप्रमाणे आहे. परंतु सत्य पान २ वर...

## ट्विंक्लिंग स्टार शाळेकडे जाणारा पूल झाला धोकादायक; विद्यार्थ्यांच्या जीवितास धोका

### तात्काळ नवीन उंच पूल बांधावा - एस.एम.युसूफ़



बीड (प्रतिनिधी) - शहरापासून लांब असलेल्या ट्विंक्लिंग स्टार शाळेकडे जाणारा पूल अत्यंत धोकादायक स्थितीत आल्याने विद्यार्थ्यांच्या जीविताला धोका निर्माण झाला आहे. या पुलाची अवस्था पाहता येथे तात्काळ नवीन उंच पूल बांधण्याची गरज आहे. यामुळे संबंधित शासकीय-प्रशासकीय यंत्रणेने येथे लवकरात लवकर नवीन पुलाचे निर्माण करावे अशी मागणी मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी केली आहे.

याविषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे पान २ वर...

## त्र्यंबकेश्वर येथे पत्रकारावर झालेल्या भ्याड हल्ल्याचा निषेधार्थ तहसील कार्यालय व पोलीस स्टेशन यांना निवेदन सादर



केज (प्रतिनिधी):- त्र्यंबकेश्वर येथे पत्रकारावर स्वामी समर्थ केंद्राजवळील पार्किंगवर दगडफेक, लाथाबुक्के यांचा वापर करून भयंकर मारहाण करण्यात आली. झालेल्या भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई शाखा केज च्या वतीने तहसील कार्यालय व पोलीस स्टेशन यांना निवेदन सादर करण्यात आले. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई, संजय भोकरे(संघटक) विश्वास आरोटे (सरचिटणीस) गोविंद वाकडे (प्रदेशाध्यक्ष) वैभव स्वामी (प्रदेश संपर्कप्रमुख) त्यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई, शाखा केजच्या वतीने निवेदन देण्यात आले. वार्तांकनासाठी गेलेल्या त्र्यंबकेश्वर येथे पत्रकारांवर पान २ वर...

## अतिवृष्टीने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ नुकसान भरपाई देण्याची मागणी-दत्ता गव्हाणे



परळी (प्रतिनिधी):- बीड -परळी वैजनाथ तालुक्यातील अतिवृष्टीने मुस्कान ग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळनुसार पाहिजे असेल तर महाराष्ट्र यांनी केली आहे. (हुडा) कौवडगावच्या नदीवर शेतकऱ्यांच्या सोबत चल आंदोलन केले.

निवेदनात म्हंटले आहे की. परळी तालुक्यात अतिवृष्टी यामुळे शेतीचे प्रचंड नुकसान झाले असून शंभर टक्के शेतकऱ्यांची हातातून गेली याचा थेट फटका शेतकऱ्याला बसला आहे. तसेच एक महिन्यांमध्ये दोन दुर्दैवी घटना कवडगाव हुडा. येथील लिंगी नदीवर घडलं दुर्दैवी घटना फक्त नदीवरील घडल्या असून या फुलाचे काम तात्काळ चालू करण्यात यावे. पुलाचे काम चालू होईपर्यंत पुलाच्या साईटने लोखंडी पोल उभे करून रस्सी बांधून संरक्षण व्यवस्था करण्याबाबत तसेच नदीकाठच्या शेतकऱ्यांना जादा रकमेमध्ये अनुदान देणेबाबत. त्यांच्या जमिनी घासून गेले आहेत. त्यांना शेतकऱ्यांना जमिनीत जावा या साठी जमिन न दिसत नाही किंवा राहीली शिल्लक नाही अनुदान देण्यात यावे. नदीत वाहून गेलेल्या व्यक्तीच्या पीडित कुटुंबाला मदत मिळवून देण्यासाठी लिंगी नदीच्या काठावर शेतकऱ्यांनी जल आंदोलन केले आहे. यावेळी जेष्ठ नेते उत्तम दादा माने. उपस्थित होते. या आंदोलनाच्या आयोजक समाजसेवक दत्तात्रय गव्हाणे. यांनी केली आहे. यावेळी गावकरी मंडळी उपस्थित पान २ वर...

## पवन करवर यांच्यावरील भ्याड हल्ल्याचा जाहीर निषेध - ॲड.सुभाष राऊत



बीड (प्रतिनिधी):- जालना येथे आयोजित धनगर समाजाच्या मोर्चात सहभागी होण्यासाठी जात असताना माजलगाव जवळील एका धाब्यावर ओबीसी समाजाचे धडाडीचे कार्यकर्ते पवन करवर यांच्यावर काही जातीयवादी गुंडांनी जीवघेणा हल्ला केला. या हल्ल्याचा समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस ड. सुभाष राऊत यांनी निषेध व्यक्त केला असून हल्लेखोरांना तात्काळ अटक करण्यात यावी अशी मागणी समता परिषदेच्यावतीने करण्यात आली आहे. याबाबत बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांची भेट घेऊन निवेदन सादर करण्यात आले आहे. आरक्षणाची मागणी शासनाकडे आहे, प्रत्येक जण आपापल्यापरीने शासनाकडे पाठपुरावा करून घटनेने दिलेल्या हक्काची मागणी करीत आहे. कोणाचाही कोणाशी वाद होण्याची आवश्यकताच नाही. कोणीच कोणाचे आरक्षण हिरावून घेऊ शकत नाही. मात्र शासनाकडे आपल्या आरक्षणाची बाजू मांडण्याऐवजी पान २ वर...

## शिवणी ग्रामपंचायतीतून घरकुल योजना अभियंता बदलण्याची मागणी !



बीड(प्रतिनिधी) शिवणी ग्रामपंचायतीने गावातील घरकुल योजनेचे जबाबदार इंजिनिअर धनवे साहेब यांची बदली करण्याची मागणी गटविकास अधिकाऱ्यांकडे केली आहे. यासंदर्भात सरपंच अजय गोविंद सुपेकर यांनी अधिकृत पत्र देऊन परिस्थितीचे गांभीर्य मांडले आहे.

ग्रामपंचायतीच्या पत्रात नमूद केल्याप्रमाणे, प्रधानमंत्री आवास योजना (घरकुल योजना) अंतर्गत गावातील अनेक लाभार्थ्यांची घरे मागील दोन वर्षांपासून अपूर्ण अवस्थेत पडून आहेत. ग्रामस्थांनी स्वतःच्या खर्चातून बेसमेंट व घरांचे काही बांधकाम पूर्ण केले असूनही इंजिनिअर धनवे साहेबांनी पुढील कामाबाबत कोणतीही दखल घेतलेली नाही. यामुळे नव्याने घरकुल योजनेत घरे मंजूर झालेल्या लाभार्थ्यांचे प्रचंड हाल होत असून, लोकांचे कॉर्पोरेशन व बँकांकडे घेतलेले कर्ज फेडणे अवघड झाले आहे. शासनाकडून योजना मंजूर होऊनसुद्धा लाभार्थ्यांना प्रत्यक्षात घरकुलाचा लाभ मिळत नसल्याची नाराजी ग्रामस्थांतून व्यक्त होत आहे. तसेच इंजिनिअर धनवे हे काही लाभार्थ्यांकडून पैशाची मागणी करत पान २ वर...

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT